**MHSI**06- 000404-2026

सं.फौ.खटला क्र. १८४/२०२६

**निशाणी क्र. ३**

**श्रीमती जे.एम. मिस्त्री, न्यायदंडाधिकारी प्र.वर्ग, सावंतवाडी यांचे न्यायालयात**

| | | |
|---|---|---|
| १. | अपराध घडल्याची तारीख | : ०३/०४/२०२६ |
| २. | फिर्याद दाखल केल्याची तारीख | : १६/०४/२०२६ |
| ३. | फिर्यादीचे नाव, वय व पत्ता | : श्री. विठ्ठल वसंत धुरी, पो.हे.कॉ./५६१<br>नेमणुक- जिल्हा वाहतुक शाखा, सिंधुदुर्ग. |
| ४. | आरोपीचे नाव, वय व पत्ता | : रामचंद्र शशिकांत कांबळे,<br>वय : ४४ वर्षे, धंदा --<br>राहणार- जांभळी,<br>ता. शिरोळ, जि. कोल्हापुर. |
| ५. | गुन्हयाचा तपशील | : |

ज्याअर्थी तुम्ही दि.०३/०४/२०२६ रोजी १९.५९ वाजताचे दरम्यान मौजे सातुळी तिठा, सावंतवाडी ते आंबोली रस्त्यावर ता. सावंतवाडी येथे तुमच्या ताब्यातील मारुती सुझुकी सिलीरिओ गाडी क्र. के.अे.-२०/एमबी-६६५८ हे वाहन सावंतवाडी ते आंबोली असे दारुचे सेवन करुन चालवीत असताना आढळुन आल्याने तुम्हास थांबवुन ब्रेथ ॲनालायझर मशिनने चेक केले असता तुम्ही दारुच्या अंमलाखाली वाहन चालविताना मिळुन आलात आणि म्हणून तुम्ही मोटार वाहन कायदयाचे कलम १८५ प्रमाणे गुन्हा केला आहे.

**आरोपीचा जबाब-**

प्रश्न १. तुम्हाला पोलीस पेपर्सच्या नकला मिळाल्या काय?

उत्तर : होय.

प्रश्न २. तुमच्याविरुध्द दाखल केलेला गुन्हा तुम्हास मराठीतून वाचून व समजावून सांगण्यात आला तो तुम्हास समजला काय?

उत्तर : होय.

प्रश्न ३. तुम्हास गुन्हा कबूल आहे काय?

उत्तर : होय. मला गुन्हा कबूल आहे.

आरोपीची सही

समक्ष,

सही/–

**(जा.म. मिस्त्री)**

**दिनांक – ०६/०८/२०२६** **न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग**

**सावंतवाडी.**

**आदेश**

**(पारीत केला दि.०६/०८/२०२६)**

१. आज रोजी आरोपी माझेसमोर हजर झाला. त्याने अर्ज दाखल करुन गुन्हा कबूल करीत आहे असे कथन केले आहे. पुढे त्याने अर्जामध्ये कमीत कमी दंडावरती मुक्तता करण्यात यावी, अशी विनंती केली आहे. त्याने केलेला गुन्हा हा त्याचा पहिलाच गुन्हा आहे.

२. वरील सर्व बाबी विचारात घेता व आरोपीविरुध्दच्या खटल्याचे स्वरुप विचारात घेता, न्यायाचा अंतिम हेतू साध्य करण्याकरिता खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

**आदेश**

१. आरोपी रामचंद्र शशिकांत कांबळे यास भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम २७५ अन्वये मोटार वाहन कायद्याचे कलम १८५ प्रमाणे गुन्ह्याकरिता दोषसिद्ध ठरविण्यात येत आहे.

२. आरोपीला मोटार वाहन कायद्याचे कलम १८५ अन्वये खालील गुन्हयाकरिता रक्कम रु.१०,०००/– (अक्षरी रुपये दहा हजार फक्त) दंड भरण्याची तसेच दंड न भरल्यास ३ (तीन) दिवस साध्या कारावासाची शिक्षा सुनावण्यात येते.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.)

JAHEDA MOHMED MISTRY

Digitally signed by JAHEDA MOHMED MISTRY
Date: 2026.08.06 17:02:18 +0530

**(जा.म. मिस्त्री)**

**दिनांक – ०६/०८/२०२६** **न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग**

**सावंतवाडी.**